# प्रेस नोट

## गोरेगांव पोलीस ठाणेकडून खूनासारख्या गंभीर गुन्हयातील आरोपी गजाआड

दिनांक ११/०८/२०२६ रोजी रात्री २३.३० वाजताच्या सुमारास '' सलमान हॉटेल, प्रेमनगर, गोरेगाव पश्चिम, समोर एका इसमास मारहाण करण्यात आली असून तो बेशुद्ध पडल्याने त्यास तेथील नागरिकांनी ट्रॉमा केअर रूग्णालय,जोगेश्वरी पूर्व, मुंबई येथे उपचाराकरिता नेले असल्याचे गोरेगांव पोलीस ठाणेस माहीती भेटली.'' त्यावेळी मारहाण झालेल्या इसमाचा भाऊ नामे श्री हबीब मोहम्मद अतिक खान हा पोलीस ठाणेस आला व त्याने त्याचा भाऊ नामे अजिज मोहमद अतिक खान, वय ३० वर्षे, रा. प्रेमनगर, गोरेगाव (पश्चिम), यांस ट्रॉमा केअर रूग्णालय जोगेश्वरी पूर्व मुंबई येथे नेले असता तेथील डॉक्टरांनी दाखलपूर्व मयत घोषित केल्याचे सांगीतले. तेव्हा सदर घटनास्थळी प्रभारी वपोनि उमरे, रात्रपाळी पर्यवेक्षक पोनि पेचे, बिट अधिकारी सपोनि राठोड व स्टाफ यांनी तात्काळ घटनास्थळी भेट दिली.

सदर घटनेबाबत मयताचा भाऊ याचे तक्रारीवरून त्यांचा भाऊ अजिज खान याने दोन अनोळखी इसमांना सलमान हॉटेलचे मालक दानिश खान यास जेवणाचे पुर्ण बिल देण्यास सांगितलेचे कारणावरून दोन अनोळखी इसमांनी अजिज खान, वय २९ वर्षे व राजेश उर्फ टकला यांचेसोबत वाद घालून ' तेरा क्या संबंध है, तु हमको जानता नही है, तेरे को देख लेंगे ' असे बोलून हाताने व फळे ठेवण्याचे लाकडी बॉक्सच्या पट्टयांनी अजिज खान याचे डोक्यात मारून त्याचा उद्देशपुर्वक मृत्यू घडवून आणला असल्याने नमुद दोन्ही अनोळखी इसमांविरोधात कायदेशीर तक्रार दिल्यावरुन सदर दोन अनोळखी इसमांविरोधात गोरेगाव पोलीस ठाणे येथे गु.र.क्र.९२२/२०२६ कलम १०३(१),११५(२), ३५२, ३५१(३), ३(५) भा.न्या.सं. २०२३ अन्वये गुन्हा नोंद केला.

नमूद गुन्हयातील आरोपी अनोळखी असून सदर परिसरातील घटनास्थळावरील प्रत्यक्षदर्शीनी आरोपींना ओळखत नसल्याचे सांगीतले. सदर आरोपीबाबत कोणेताही खात्रीशर माहीती उपलब्ध नव्हती. त्यामुळे आरोपीची ओळख पटवून आरोपीतांना अटक करणेसाठी, पोलीस उप आयुक्त, उत्तर परिमंडळ - १, मधील पोलीस ठाणेचे गुन्हे प्रकटीकरण अधिकारी व अंमलदार यांच्या ६ तपास टिम तयार करून, आरोपीतांचा शोध सुरु केला. सदर तपास पथकांनी गोरेगाव परिसरात सतत शोध मोहीत राबवली व मिळालेल्या गोपनीय माहीतीच्या आधारे गुन्हयातील आरोपीचा शोध घेवून त्यांना ताब्यात घेण्यात आले व त्यानंतर त्यांचा गुन्हयातील सहभाग निष्पन्न झालेनंतर व सर्व पडताळणी केलेनंतर तसेच आरोपीतांनी गुन्हा कबुली दिल्यांनतर त्यांना या गुन्हयामध्ये दि.१३/०८/२०२६ रोजी ०२/४३ वा.अटक केली.

अटक आरोपींचे नावे पुढीलप्रमाणे १) अजय मुन्नी उपाध्याय,वय-३९ वर्षे, व्यवसाय-काही नाही, रा.ठी - हनुमानगर, गोरेगाव पश्चिम, मुंबई, २) विकास देवराज पासवान, वय-२३ वर्षे, व्यवसाय-ऑफीस बॉय, रा.ठी. -प्रेमनगर, गोरेगाव पश्चिम, मुंबई. अटक आरोपीतांना आज रोजी मा.न्यायालयात हजर केले असता, मा.न्यायालयाने आरोपीतांना दि.२३/०८/२६ पर्यंत पोलीस कोठडी दिली आहे. पुढील तपास गोरेगाव पोलीस ठाणे करित आहे.

अशाप्रकारे गोरेगाव पोलीस ठाणेकडील सदर गंभीर गुन्हा पोलीस उप आयुक्त, उत्तर परिमंडळ -१ मधील पोलीस अधिकारी व अंमलदार यांनी अथक प्रयत्न करून, गुन्हा घडलेपासून २४ तासाचे आतमध्ये गुन्हा उघडकीस आणून दोन्ही आरोपीतांना अटक करून उत्कृष्ट कामगिरी केली आहे.

सदरचा गुन्हा हा उघडकीस आणण्याकरिता श्री.देवेन भारती, मा.पोलीस आयुक्त,मुंबई, श्री.मनोजकुमार शर्मा, सह पोलीस आयुक्त (का.व सु.), श्री शशीकुमार मिना, अपर पोलीस आयुक्त,उत्तर प्रादेशिक विभाग, मुंबई ,श्री.अभिनव देशमुख, पश्चिम प्रादेशिक विभाग, मुंबई, श्री पुरुषोत्तम कराड, मा. पोउआ, उत्तर परिमंडळ - १, मुंबई, श्री सुनिल जाधव,मा.सपोआ, गोरेगांव विभाग,यांचे मार्गदर्शनाखाली श्री सतीश उमरे, प्र.व.पो.नि. गोरेगाव पोलीस ठाणे, श्री उमेश दंडिले, पोनि गुन्हे., तपास अधिकारी पोनि श्री सोहन पेचे, सपोनि. सतिश चौगले, राठोड, दिपक खराडे, योगेश रंधे, पोउनि नवनाथ कांगणे, आकाश काळे, सत्पाल बोधे, विशाल दौडकर, अक्षय मादंळे, रोहन कोलारे, सुर्यभान घोलप, गजानन हरबळे, गुन्हे प्रकटीकरण पथकातील पोलीस अंमलदार पो.ह.वा.प्रदिप कुलट, विनोद चव्हान, दिनकर तावडे, दत्तात्रय बागुल, सचिन दळवी, कल्पेश नेहरे, भरत कदम, पो.शि.सौरभ चव्हाण, प्रज्वल मोहीते, भुपेंद्र सालकर, विशाल दानी, सतिश पाटील, सचिन मेश्राम, सुहास शिंदे यांनी उत्कृष्ट कामगिरी केली आहे.